**पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 07252-232134.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

---

क्रमांक :- पोअवा/प्रलि-आस्था/सर्वसाधारण बदल्या/ 2685 /2023, वाशिम, दिनांक :- 12.04.2023

13 APR 2023

**विषय :- पोलीस अंमलदार यांच्या सर्वसाधारण बदल्या सन - 2023-24**

**परिपत्रक** :-

1) महाराष्ट्र शासन गृहविभाग यांचे सन 2015 चे अध्यादेश क्रमांक 2 महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात काही सुधारणा करण्याकरीता अध्यादेश दि.16.02.2015 व मा.पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/3/अधिसुचना/14/2014/73, दिनांक 25.02.2015 आणि महाराष्ट्र शासन गृहविभाग, परिपत्रक क्र. न्यायाप्र 3115/प्र.क्र.8/पोल-3, दि.01 जुलै 2015 मधील खालील तरतुदी विचारात घेवुन जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळाद्वारे बदल्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे आपल्या येथे नेमणूकीस असलेले पोलीस अंमलदार (पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक) यांचे नावाची यादीसह त्यांचे विनंती अर्ज या कार्यालयास दि.30.04.2023 पर्यन्त ई-मेल आयडी-sp.washim@mahapolice.gov.in वर सादर करावेत.
2) पोलीस दलातील कोणत्याही पोलीस स्टेशन/शाखा व युनिट मधील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर एखादया कर्मचा-याची पदस्थापना झाल्यानंतर, तो कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी सामान्यत: जास्तीत जास्त पाच वर्ष कालावधीपर्यन्त राहू शकतो. तथापी प्रशासकीय कारणास्तव व अन्य कारणास्तव संबंधीत आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार आणि संबंधीत पोलीस शिपाई यांची बदली सामान्य पदावधी पुर्ण होण्यापुर्वी देखील होवू शकते.
3) पोलीस कर्मचा-यांना एका पोलीस स्टेशन व शाखेमध्ये नेमणुकीच्या दिनांकापासुन पाच वर्षाचा कालावधी ठेवण्यात आला आहे. पाच वर्षापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास त्याची तात्काळ अन्यत्र बदली करण्यात येईल.
4) दिनांक 31.05.2023 पर्यन्त पाच वर्ष पुर्ण करणा-या पोलीस अंमलदार यांची बदली करण्यात येणार आहे.
5) पोलीस अंमलदार यांचे स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणुक/बदली करता येणार नाही. पोलीस मुख्यालयात काम करीत असलेल्या संवर्गातील कर्मचा-यांसाठी हा नियम लागु असणार नाही.
6) दिनांक 31.05.2023 पर्यन्त पाच वर्ष पुर्ण करणा-या पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (PC TO ASI) यांचे सोबत जोडलेल्या सहपत्र "अ" नमुन्यात विनंती अर्ज त्यांचे नांवाचे यादीसह या कार्यालयास दिनांक 30.04.2023 पुर्वी सादर करावे. केवळ पसंतीच्या ठिकाणी बदली करणे हा शासकीय कर्मचा-यांचा हक्क नाही, त्यामुळे कर्मचा-यांनी पसंतीच्या ठिकाणी बदली करण्यास आग्रही असु नये. बदलीकरीता नमुद केलेल्या पसंतीचे ठिकाणी बदली करण्याबाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येईल. मात्र रिक्त पद उपलब्ध नसल्यास प्रशासकीय दृष्टीकोणातुन ईतर ठिकाणी रिक्त पदावर बदली करण्यात येईल.
7) बदलीस पात्र अंमलदारा व्यतिरिक्त बदलीसाठी विनंती अर्ज सोबतचे सहपत्र "ब" नमुन्यात या कार्यालयास दिनांक 30.04.2023 पुर्वी पाठवावे, विनंती करणा-या पोलीस कर्मचा-यांनी विनंतीनुसार बदली मिळणे हा त्यांचा हक्क नाही. रिक्त पदे विनंतीचे स्वरुप विचारात घेवुन प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार बदलीबाबतचे विनंती अर्ज निश्चितपणे विचारात घेण्यात येतील.
8) बदलीसाठी पसंतीची 03 ठिकाणे देतांना मुळ स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणुक/ बदली अनुज्ञेय नसल्याने मुळे तालुक्याचा उल्लेख पसंतीच्या ठिकाणात करु नये. वरील बाब दुर्लक्ष करुन जे अंमलदार अर्जामध्ये पसंतीचे ठिकाण नमुद करतील, त्यांची विनंती अमान्य करण्यात येईल.
9) बदली/ नेमणुकीबाबत पोलीस अंमलदाराने अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडुन संदर्भ / विनंती करु नये. अशी विनंती अन्य कोणाही मार्फत पाठवु नये. पाठविल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा त्यांचा अधिकार नसुन प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन बदलीचा विचार केला जाईल. पसंतीचे ठिकाणी बदली मिळविणेकरीता कोणत्याही प्रकारे दबाव/शिफारस असल्यास संबंधीत कर्मचा-याविरुध्द

गैरवर्तनाची दखल घेवून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिले) आणि वर्तणुक नियमाखाली गंभीर कार्यवाही करण्यात ये. तसेच त्यांचे सेवापटात त्याबध्दल नोंद घेण्यात येईल.

10) पोलीस अंमलदारांच्या अर्जामध्ये त्यांची पोलीस स्टेशन/शाखेतील नेमणुकीचा दिनांक, तैनाती रजिस्टरातुन तपासुन खात्री करावी, त्यामध्ये काही अपवादात्मक परिस्थिती उद्‌भवल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधीत पोलीस कर्मचारी व संबंधीत ठाणेदार व शाखा प्रभारी यांची राहील. तसेच ठाणेदार/प्रभारी शाखा अधिकारी यांनी अभिप्राय देतांना विनंतीमध्ये नमुद बाबी ख-या आहेत किंवा कसे ? याबाबत अभिप्राय नमुद करावे. फक्त शिफारस करु नये. ठाणेदाराचे अभिप्राय असल्याखेरीज अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही. बदल्यासाठी अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये सादर करावे. अपुर्ण व त्रोटक, साध्या कागदावरील अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

11) डयुटी पासवर जे अंमलदार आहेत. त्यांचा नेमणुकीच्या ठिकाणचा दिनांकीत कालावधीत व डयुटी पासवर हजर झालेला दिनांकीत कालावधीबाबत वेगळी यादीसह माहिती सादर करावी.

12) मागील सार्वजनिक बदलीमध्ये बदली झालेल्या परंतु अद्याप पावेतो बदलीच्या ठिकाणी हजर न झालेल्या पोलीस अंमलदार यांची माहिती सादर करावी.

13) नमुद प्रमाणे प्राप्त झालेली माहितीची संबंधीत पोलीस अंमलदार यांच्या सेवापटावरुन अचुक पडताळणी करण्याची कार्यवाही आस्थापना शाखा-2,3,6 यांनी करावी.

14) सर्व ठाणेदार व शाखा प्रभारी अधिकारी यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व पोलीस अंमलदार यांची एकत्रित माहिती तयार करुन सदरची माहिती ही ई-मेल आयडी-sp.washim@mahapolice.gov.in वर व हार्ड कॉपी या कार्यालयास दिनांक 30.04.2023 पावेतो सादर करावी. बदलीसंदर्भात कोणीही अंमलदार आस्थापना शाखेत येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

15) आपले येथे नेमणुक असलेले पोलीस अंमलदारापैकी जे पोलीस अंमलदार त्यांचे कर्तव्य व्यवस्थितरित्या पार पाडत नाहीत, गैरहजर व व्यसनाधिन आहेत. यांचे कसुरीवरील बदलीच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल बंद पाकीटामध्ये पोलीस अधीक्षक यांचे लघुलेखक यांचेकडे सादर करावा.

16) सन 2022 च्या सर्वसाधारण बदल्यामध्ये बदली झालेले परंतु आतापर्यन्त बदलीवर कार्यमुक्त करण्यात आले नाहीत. अशा पोलीस अंमलदारांना त्यांच्या बदलीचे ठिकाणी 22 एप्रील 2023 चे रमजान ईद बंदोबस्त संपताच तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावेत.

**सहपत्र :- नमुना "अ" व "ब"**

**( बच्चन सिंह, भापोसे.)**
**पोलीस अधीक्षक, वाशिम**

**प्रति,**

उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम/मंगरुळपीर/कारंजा/पोलीसउपअधीक्षक, मुख्यालय,वाशिम/आर्थीक गुन्हे शाखा,वाशिम/ ठाणेदार, पोस्टे.वाशिम शहर/वाशिम ग्रामीण/मालेगांव/शिरपुर/रिसोड/अनसिंग/आसेगांव/जऊळका/मंगरुळपीर/कारंजा शहर/कारंजा ग्रामीण/ मानोरा/ धनज/ सायबर/ पोनि.स्थागुशा/जिविशा/जिवाशा/शवाशा/वाचक शाखा/नियंत्रण कक्ष/मतनि/अंगुली मुद्रा/कल्याण शाखा/ दहशतवाद विरोधी पथक/मोपवि/बिडीडीएस/श्वान पथक/रापोनि.पोलीस मुख्यालय,वाशिम

2/- आपण सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पोलीस अंमलदार यांना दोन्ही वेळेच्या गणनेमध्ये वाचुन दाखविण्यात यावे. तसेच सदरच्या परिपत्रकाची एक प्रत पोलीस स्टेशन/शाखेतील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी. ठाणेदार/शाखा प्रमुख यांनी पोलीस अंमलदार यांचे विनंती अर्ज एकत्रितपणे विहीत नमुन्यात मुदतीच्या आत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय देवून दि.30.04.2023 पुर्वी या कार्यालयास न चुकता सादर करावा. तसेच उशिराने प्राप्त झालेले विनंती अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

3/- तसेच सर्व उपविभागातील उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेप्रभारी/शाखा प्रभारी यांना कळविण्यात येते की, त्यांच्या ठाण्यातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे पोस्टे व शाखेतील तैनाती रजिस्टरप्रमाणे ज्या कर्मचा-यांना दि.31.05.2023 रोजी पाच वर्षाचा कालावधी पुर्ण होणार आहे किंवा झालेला आहे. अशा कर्मचा-यांनी यादी दि.30.04.2023 पुर्वी न चुकता या कार्यालयातील आस्थापना शाखेत प्रत्यक्ष सादर करावी. सदरची यादी सादर करतांना विलंब होणारनाही याची नोंद घ्यावी.

प्रत माहितीस :-

अपर पोलीस अधीक्षक, वाशिम/पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय, वाशिम

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस :-

संगणक कक्ष/डिपीजी लिपीक

2/- संगणक कक्ष यांनी सदरचे परिपत्रक त्वरीत वाशिम पोलीस यांच्या संकेतस्थळावर सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रभारी अधिकारी/रापोनि पोलीस मुख्यालय, वाशिम यांना ई-मेल द्वारे त्वरीत कळवावे. तसेच ई-मेलवर प्राप्त झालेली माहिती आस्थापना शाखेत विनाविलंब सादर केल्या जाईल याची नोंद घ्यावी.

## सहपत्र - अ

**(प्रशासकीय कारणास्तव एका ठिकाणी दिनांक ३१.०५.२०२३ रोजी ५ वर्ष किंवा ५ वर्षापेक्षा जास्त)**

सर्वसाधारण बदल्या २०२३-२४ करीता सध्याच्या पदावरील ५ वर्ष पुर्ण किंवा ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा बदलीसाठी भरावयाचे प्रपत्र

१) कर्मच्याऱ्याचे संपुर्ण नाव व पदनाम :---------------------------------------------------------------------------- ब.नं.-----

२) सध्याचे नेमणुक ठिकाण व कालावधी :----------------------------------------------------------------------------

३) पो.स्टे./शाखेतील नेमणुकीचा दिनांक :----------------------------------------------------------------------------

४) स्वत:चे मुळ गाव/तालुका/जिल्हयाचे नाव नमुद करावे :------------------------------------------------------------

५) स्वग्राम तालुक्यात येणारे पो.स्टे.चे नाव :----------------------------------------------------------------------------

६) सन २०२३-२४ या शैक्षणीक वर्षात १० वी मधे शिकणाऱ्या मुलाची नावे :------------------------------------------------

७) १० वी मधे शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचे नाव :----------------------------------------------------------------------------

८) सन २०२३-२४ या शैक्षणीक वर्षात १२ वी मधे शिकणाऱ्या मुलांची नावे :- ------------------------------------------------

९) १२ वी मधे शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचे नाव :----------------------------------------------------------------------------

१०) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी जंगी/स्थावर मालमत्ता/कुटुंबाचा व्यवसाय आहे काय :- होय/नाही.

(आहे तर तसा उल्लेख करावा) :- ----------------------------------------------------------------------------

११) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी त्याअगोदर कर्तव्य पार पाडले आहे काय? असल्यास त्या पो.स्टे./शाखेचे नाव व कालावधी नमुद करा :----------------------------------------------------------------------------

१२) या पुर्वीच्या पाच वर्षात झालेली बदली रद्द झाली होती काय? होय किंवा नाही. तसेच या अर्ज करण्याचे अगोदर बदली झाली होती काय? होय किंवा नाही (असल्यास ते नमुद करावे.) ----------------------------------------------------------------------------

१३) या पुर्वीचे नेमणुकीचे ठिकाण नमुद करावे:-

१) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत---------- २) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत----------

३) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत---------- ४) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत----------

५) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत---------- ६) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत----------

१४) बदली पाहीले असलेले पसंतीचे तीन ठिकाण नमुद करावे(स्वग्राम/तालुका व यापुर्वी नौकरी केलेले ठिकाणाचे नावाचा उल्लेख मागु नये)

१.---------------------------- २.------------------------------ ३.----------------------

१५) कर्मच्याऱ्यांची विनंती :----------------------------------------------------------------------------

----------------------------------------

(मला पाहिजे असलेल्या बदली नेमणुकीबाबत या अर्जाव्यतीरिक्त कोणत्याही व्यक्तीकडे संदर्भ/विनंती केलेली नाही. अशी विंनती अन्य कोणाही मार्फत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवु नये. विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसुन प्रशासकीय सोईनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन माझा विचार केला जाईल ही बाब मला मान्य आहे. तसेच मी वरिल प्रमाणे भरलेली माहिती बरोबर आहे यामधे काही विसंगती आढळुन आल्यास त्यामधे मी स्वत: जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.)

(अर्जदाराची स्वाक्षरी)

१६) ठाणेदार यांची शिफारस :- ------------------------------------------------------------वर नमुद अर्जदार यांनी भरलेली माहिती मी स्वत: पोलीस स्टेशन/शाखेतील तैनाती रजिस्टर वरुन त्यांच्या नेमणुकीचा दिनांक बरोबर आहे हे मी तपासले असुन बरोबर आहे.

(ठाणेदार/शाखा प्रभारी यांची स्वाक्षरी व शिक्का)

**सहपत्र - ब (विनंती वरुन स्वखर्चाने)**

सर्वसाधारण बदल्या -२०२३-२४ करीता

सध्याच्या पदावरील कार्यकाळ पुर्ण झाला नसताना विनंती करुन स्वखर्चाने बदलीसाठी भरावयाचे प्रपत्र

१) कर्मच्याऱ्याचे संपुर्ण नाव व पदनाम :---------------------------------------------------------------------------------- ब.नं.-----

२) सध्याचे नेमणुक ठिकाण व कालावधी :------------------------------------------------------------------------------------------

३) पो.स्टे./शाखेतील नेमणुकीचा दिनांक :------------------------------------------------------------------------------------------

४) स्वत:चे मुळ गाव/तालुका/जिल्हयाचे नाव नमुद करावे :------------------------------------------------------------------------------

५) स्वग्राम तालुक्यात येणारे पो.स्टे.चे नाव :---------------------------------------------------------------------------------------

६) सन २०२३-२४ या शैक्षणीक वर्षात १० वी मधे शिकणाऱ्या मुलाची नावे :-------------------------------------------------------------

७) १० वी मधे शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचे नाव :----------------------------------------------------------------------------------

८) सन २०२३-२४ या शैक्षणीक वर्षात १२ वी मधे शिकणाऱ्या मुलांची नावे :- -------------------------------------------------------------

९) १२ वी मधे शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचे नाव :---------------------------------------------------------------------------------

१०) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी जंगी/स्थावर मालमत्ता/कुटुंबाचा व्यवसाय आहे काय :- होय/नाही.

(आहे तर तसा उल्लेख करावा) :- --------------------------------------------------------------------------------------------------------

११) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी त्याअगोदर कर्तव्य पार पाडले आहे काय? असल्यास त्या पो.स्टे./शाखेचे नाव व कालावधी नमुद करावा

:----------------------------------------------------------------------------------------------------------

१२) या पुर्वीच्या पाच वर्षात झालेली बदली रद्द झाली होती काय? होय किंवा नाही. तसेच या अर्ज करण्याचे अगोदर बदली झाली होती काय? होय किंवा नाही (असल्यास ते नमुद करावे.) ---------------------------------------------------------------------------------

१३) या पुर्वीचे नेमणुकीचे ठिकाण नमुद करावे:-

१) पो.स्टे.------------पासुन -------------पर्यंत---------- २) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत----------

३) पो.स्टे.------------पासुन -------------पर्यंत---------- ४) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत----------

५) पो.स्टे.------------पासुन -------------पर्यंत---------- ६) पो.स्टे.------------पासुन ------------पर्यंत----------

१४) बदली पाहीले असलेले पसंतीचे तीन ठिकाण नमुद करावे(स्वग्राम/तालुका व यापुर्वी नौकरी केलेले ठिकाणाचे नावाचा उल्लेख मागु नये)

१.------------------------------ २.---------------------------------- ३.------------------------

१५) कर्मच्याऱ्यांची विनंती :----------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------

(मला पाहिजे असलेल्या बदली नेमणुकीबाबत या अर्जाव्यतीरिक्त कोणत्याही व्यक्तीकडे संदर्भ/विनंती केलेली नाही. अशी विंनती अन्य कोणाही मार्फत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवु नये. विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसुन प्रशासकीय सोईनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन माझा विचार केला जाईल ही बाब मला मान्य आहे. तसेच मी वरिल प्रमाणे भरलेली माहिती बरोबर आहे यामधे काही विसंगती आढळुन आल्यास त्यामधे मी स्वत: जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.)

(अर्जदाराची स्वाक्षरी)

१६) ठाणेदार यांची शिफारस :- --------------------------------------------------------------वर नमुद अर्जदार यांनी भरलेली माहिती मी स्वत: पोलीस स्टेशन/शाखेतील तैनाती रजिष्टर वरुन त्यांच्या नेमणुकीचा दिनांक बरोबर आहे हे मी तपासले असुन बरोबर आहे.

(ठाणेदार/शाखा प्रभारी यांची स्वाक्षरी व शिक्का)